| तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी बार्शिटाकळी जि.अकोला यांचे कार्यालय, बार्शिटाकळी | |
|---|---|
| क्र.कक्ष- प्रस्तु-१/अका/कावि- 1008 /२०१६ | दिनांक: 22/06/2016 |
| कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक : | ई मेल आयडी - |

<u>अत्यंत महत्वाचे</u>

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,
(भूसुधार विभाग)
अकोला

विषय :- मौजे मोझरी ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील श्री. मधुकर शेवला राठोड व इतर ९ यांचे शेतात सिंचनाकरिता खाजगी पाईपलाईन टाकणे करीता २५/२४ २७.०७ हे. वन क्षेत्र वळती करण्याचा प्रस्ताव.

संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र प.क्र.कक्ष/अका/भुसुधार/कावि- /२०१ दिनांक

महोदय,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये श्री. मधुकर शेवला राठोड व इतर ९ रा. मोझरी ता.बार्शिटाकळी यांनी त्यांचे शेतात सिंचनाकरीता मौजे मोझरी ता. बार्शिटाकळी जि.अकोला येथील वन विभागाचे कपार्टमेंट नं. २५ व २४ मधील २७.०७ हे. वन क्षेत्रातून मोझरी तलावातून खाजगी पाईपलाईन टाकण्याकरीता वन विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रस्तावासोबत वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करतांना अनुसूचित जाती जमाती व वंशपरंपरागत वन अधिवासी नियम २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांचे आंग्ल भाषेत व केंद्र शासनाचे विहीत प्रपत्रातच प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असल्यामुळे ते देण्याबाबत उपवनसंरक्षक (प्रा) अकोला, वन विभाग अकोला यांनी मागणी केली आहे.

त्यानुसार सदर प्रमाणपत्र देण्याकरिता ग्रामपंचायत, मोझरी यांचेकडून अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे ) अधिनियम २००६ व नियम २००८ अंतर्गत अर्जदारांनी मागणी केलेल्या वन जमिनीच्या सामुहिक हक्कासाठीचा दाव्याचा अर्ज व प्रस्ताव मागविण्यात आला.

ग्राम पंचायत, मोझरी यांचेकडून प्राप्त सदर वन जमिनीच्या सामुहिक हक्कांसाठीच्या दाव्याचा अर्ज व प्रस्ताव मुर्तिजापूर उपविभाग स्तरीय समितीच्या दिनांक 22 जून, 2016 रोजीच्या सभेसमोर ठेवण्यात आला. समीतीमधील सर्व सदस्यांनी सदर प्रस्तावानुसार अर्जदार श्री. मधुकर शेवला राठोड व इतर ९ सर्व रा. मोझरी ता. बार्शिटाकळी जि.अकोला यांना त्यांचे शेतात सिंचनाकरीता मौजे मोझरी ता. बार्शिटाकळी जि.अकोला वन विभागाचे कपार्टमेंट नं. २५ व २४ मधील ०.०८ हे. वन क्षेत्रामधून मोझरी तलावातुन खाजगी पाईप लाईन टाकण्याकरीता सहमती असल्याबाबत व सदर अधिनियमानुसार शेतकऱ्यांना परवानगी दिल्यास मौजे मोझरी येथील गावकऱ्यांचे हक्क बाधीत होणार नाहीत असे ठरविले आहे.

त्यानुसार वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्तावासोबत आवश्यक असणारे अनुसूचित जाती जमाती व वंशपरंपरागत वन अधिवासी नियम २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी, अकोला यांचे आंग्ल भाषेत व केंद्र शासनाचे विहीत प्रपत्रात प्रमाणपत्र देण्यास उपविभागीय समिती, मुर्तिजापूर सहमत आहे.

आपला विश्वासू

तहसिलदार तथा
सदस्य सचिव
वन हक्क दावा उपविभागीय समिती

उपविभागीय अधिकारी तथा
अध्यक्ष वन हक्क दावा उपविभागीय
समिती, मुर्तिजापूर

सभापती
पंचायत समिती, बार्शिटाकळी

उप सभा, पंचायत समिती ~~सदस्य~~, बार्शिटाकळी
तथा अशासकीय समिती सदस्य

पंचायत समिती सदस्य, बार्शिटाकळी
तथा अशासकीय समिती सदस्य

वन परिक्षेत्र अधिकारी, धाबा
तथा शासकीय सदस्य